**नि. फौ. ख. क्र.५७५/२०२३**

सरकार वि. इमरान कुरेशी

**नि.क्र.१४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– वैभव रमेश साबळे,</u>**

वय–३९ वर्षे, व्यवसाय–मजुरी,

रा. अंथुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.११/०९/२०२२ रोजी मी पोलीस स्टेशनला गेलो होतो. माझेसमक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. पोलीसांनी माझी एका कागदावर सही घेतली. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावरील सही माझीच आहे. मजकूराविषयी मला काही माहिती नाही. **<u>सहीस नि.क्र.१५</u>** देण्यात येते.

*<u>(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकिलांनी उलटतपासात ग्राहय असलेले प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी देण्यात आली.)</u>*

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०९/२०२२ रोजी पोलीसांनी मला व भिवा लोंढे याला जप्ती पंचनामा करण्यासाठी पोलीस स्टेशनला बोलविले. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष एम.एच.४२ ए. क्यू.५४४९ या गाडीचा जप्ती पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा सकाळी १०.०० वाजता सुरु होवून १०.३० वाजता संपला. हे म्हणणे खरे नाही की, मी व भिवा लोंढे यांनी पंचनामा वाचून समजून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.एम. पी. लोंढे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

**३.** उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.१३/०८/२०२५** इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.